GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# लढाऊ माय

**बालाजी ग्यानोबा कांबळे**

(सहायक प्राध्यापक)
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल)
मुंबई विद्यापीठ,मुंबई

घरातील परिस्थिती नाजूक होती. तरी ही माय .. आपला संसार मोठ्या जिकरीन पुढ लोटत होती. दिवसा मागून दिवस भरा .. भरा निघून जात होता. गावातील लोकांच्या शेतीच्या कामावर जाऊन आपल्या मुलाच्या शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्याचा जणू तीने चंग बांधला होता., दिवस भर शेतीतील काम करून संध्याकाळी डोक्यावर लाकडांची मोळी घेऊन येत असतं .. तिचा जोडीदार तिची साथ सोडून बरेच दिवस झालं होत , आपल्या भावकित आपल्या घराण्याच नाक खाली होऊ नये.. म्हणून ती अतिशय प्रामाणिक काम करत असत . .. तिच माहेर तस पहिल तर सदन होत. पण माझ्या मायची आई बालपणी वारली(निधन) म्हणून.., आई विना पोरक जीवन नशिबी आल होत. आपले मुलं ही बापा विना पोरके होऊ नये, म्हणून माय ," आपल्या मुलांना बापाची आणि आईची कमतरता पडू दिली नाही ,तिला माहीत होत की, आपल्या डोक्यावरील आईच किवा वडिलांचे छत्र नसेल तर किती मोठा संघर्ष करावा लागतो हे तिने बालपणापासूनच अनुभवत होती. माहेरची मंडळी तिचा विवाह करून दिला. तिला कोणताच आधार दिला नाही. तिला तस पहिल तर जोडीदार तिच्या नशिबाने प्रेमळ मिळाला होता. पण त्यांना सहा मूल झाली त्याच्या डोक्यावर भरपूर कर्ज झाल आणि तो गिरजाला सोडून गेला परंतु...... माहेरची मंडळी उभ आयुष्यभर तिला साथ दिली नाही ..!

गिरजाच्या माग सहा मुले सोडून कर्ज बाजारी होऊन बाप गांव सोडून मुंबईला गेला होता. त्यामुळे सारी जबाबदारी मायवर येऊन पडली होती , आपल्या जोडीदारास दोष न देता आपल्या मुलांना शिक्षणाचे धडे देऊ लागली होती ....! सहा ही मुलांना शाळेत टाकून एकटीच तो खर्च भागवत असत. सारी गावातील लोक तिला सल्ला देत असत .. " बाई .. जना ... कुठवर या पोरांना शिकवशील ग ..! कुठ

नौकरी लागणार .. हाय " उग जिवाची परेशानी" काय तरी काम लाव आता पोरांना .. अस प्रत्येक गावातील व शेजारी मंडळी तिला सल्ला देत असत .. पण माय माझी .. फार जिद्दी होती. , ती त्यांच बोलण झालं की, शांत पणे उत्तर देई .."बाई, आमच जीवन बिगर शिक्षणाने जीवन वाया गेल हाय .." माझ्या लेकरांच जीवन मी वाया जाऊ देणार नाही म्हणून जीवाच्या आकांताने बोलत असत .. पण तिला कोणी साथ मात्र देयाच नाही .. नेहमी तिची उपेक्षा व्हायची, पण तिने कधी आपला धिर खचू दिला नाही ..! आणि आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आपल आयुष्यभर मेहनत केली. मुलांनी पण मन लाऊन शिक्षण पूर्ण केल .. सारी मूल आपल शिक्षण करून घरी आली आणि मिळेल त्या कामास आईला मदत करू लागली होती. गावातील लोक त्याच्याकडे पाहून काय..? फायदा झाला, या शिक्षणाचा म्हणून जनाबाईस हिनऊ लागले , पण जना त्यांच्या कडे लक्ष न देता आपल्या कामाला लागत असत .. तिचा मोठा मुलगा आत्ता चांगला मोठा झाला होता आत्ता जनाला त्याचा मोठा आधार वाटू लागला होता .. तिने मोल मंजूरी करून लेकरांचे तोंड मारून ठेवलेले काही पैसे तिच्याजवळ जमा झाले होते .. तिच्या डोक्यात आल की आपण या पैशातून एखादी लहानशी कारवड घ्याव.., आणि तिला मोठ करांव असा विचार तिच्या डोक्यात आला आणि आपल्या मोठ्या मुलांना जवळ बोलून म्हणाली बापू...बालाजी , तू घरातला मोठा मुलगा हाइस. .. तवा तुला ही माहीत असाव.. म्हणून म्या .. एक गोष्ट सांगाव म्हणतो .. बालू काळजीच्या सुरात काय ..? झालं.. माय सांग काय झाल ते .. माय हसून म्हणाली बापू एक एक पैसा जमा करून ठेवलो आहे ..? त्याची एक गाय घेवाव काय म्हणाले .. माय न त्यास विचारली तेव्हा मी म्हणाला .. एवढे पैसे .. आपल्याकडे कुठे आहेत ..? आर .. बापू .. म्या पै .. पै जमा करून सातशे रुपये जमा केली हाय.. . जा तू उदयाला माकणीला महादू .. मामा हाय.. आज रविवार हाय तो आज घरीच रहातो ..तू आज माकणीला जाऊन त्याला शंकर पाटलांच्या ढोरात बक्कळ .. वासर.. आहेत .. कुठ तर तो चांगली जातवान कारवड .. बघून घेऊन देईल .. अशी माय.. म्हणताच माझ्या अंगात वीज चमकली .. मनोमन

https://www.gapbhasha.org/

आनंद झाला. मी मायला म्हणालो ......? आत्ताच्या आत्ता मी माकणीला जातो आणि सांगतो मामाला म्हणून माकणीला जाण्याची तयारी करू लागला .. आमच्या शेजारचा मुकादम खंडू बाबा म्हणाला, आमच्या माय लेकरांच्या तोंडातून माकणी.... या गावचा उच्चार झाल्यामुळे तो थांबला..! कारण त्याची मुलगी ही माकणीत दिली होती. त्यामुळे तो आमच्याकडे लक्ष दिला .. " काय विचार चालू हाय र.. माय लेकरांच म्हणून वाटेने जाता जाता तिथेच थांबला . माय म्हणाली काही नाही भावजी आमच्या बाळजीला माकणीला जा .. म्हणून सांगतो माझ्या माहेरात लई ढोर वासर हाइत ..? एक कारवड आण ? महादू दादा कड सारी जनावर भेटतात, नाही तर कुठूनही तो घेऊन देतो म्हणून ह्याला जा म्हणते... काय करांव बापू आम्हाला कोणाचा आधार हाय जि... कसे का राहिनात .. "आम्हा ला त्यांच्या विना कुठ दीकहाय" म्हणून आपली दुख:भरी कहाणी सांगू लागली त्यावर खंडू बाबा बोलला .. आय .. जना .. भल्या भल्या च राज पण निघून जाते , आज तुझे लेकर लहान हाइत... म्हणून काय झालं हेच बघ.. उदयाला काय..? काय ..? करतील .. तुझ्या श्रीमंत माहेरचे उद्या यांच्याच तोंडाला बघतील .. हे काय दिवस रहाणार नाहीत , असे म्हणू लागला आणि माय त्याला म्हणाली .. काय .. हायकी जि .. बापू नशिबात .. ते कोणाला माहीत हाय .. ? मला माझ्या चिमण्याला आत्ता जगवण्याच पडलंय ,म्हणून डोळ्यात पानी आणून माझ्याकड पाहू लागली , मी म्हणालो .. तुला येळच नाही ..? रडायला चल मला उशीर होतोय .. दे पैसे मी जातो आत्ता आणि काही ही हो .. आज गाय आणतोच .. असे म्हणू लागलो ..? "खंडू बाबा म्हणाला काय" .?. बाई धाडशी हाय .. लेकराचा यवढा टोकरा .. सोडून गेला मुंबईला तरी कसं .. संसार करते बाई .. म्हणून पुढ निघून गेला ..?

मायन मला समजावून सांगितले . बापू .. काय बी .. हो.. पण "बेपारी माधव मामा" ला सांग की, चांगली मोठ्या रोपाची ढोरातील एक कारवड घेऊन दे म्हणावं; .. म्हणून माझ्या हातात जमा पुंजी करून ठेवलेले ७०० रुपये ठेवली .. मी आयुष्यात ७०० रु पहिलं नव्हत .. पैसे पाहून मी म्हणालो मोठी गाभणीच गाय बघायाला सांगतो, .. तेवढ्यात माय म्हणाली .. नाही बापू एवढ्या पैशात कुठ गाभणी गाय येते काय ..? .. अजून काही पैशाची जोड करून देऊत म्हणू सांगतो , पण माझ्या मायला माहीत होते की, आपल्यावर कोणी भरवसा करणार नाही म्हणून .. माहेरचे लोक तर अगोदर म्हणतील गाय कशाला घेता ..? म्हणून गाय घेण्याच मोडा घालतील ..? म्हणून त्याना काही ही कळू देऊ नको म्हणून समजावून सांगितली .. मी .. हो .. करत आजोळी .. माकणीला निघालो .. आबूलगा ते माकणी चे अंतर हे पाच किलोमीटर आहे ....?माझी जाण्यासाठी धावपळ सुरू झाली. कारण जनावर रानात जाण्या अगोदर आपण माकणीला पोहचल पाहिजे म्हणून घरातून लवकर निघालो होता. माझ्या सोबतीला लहान भाऊ तानाजी .. ही तयार झाला. माय म्हणाली .., एकला दोघं जावा .. बापू... म्हणून माझ्या छोट्या भावाला सोबत पाठवली .छोटा भाऊ फार हुशार आणि कणखर होता. दिसायला लहान पण बऱ्याच गोष्टी त्याला समजत होत्या .. मी आणि तो माकणीला कधी पोहचलो हे आम्हा दोघा भावंडाना कळलंच नाही. आम्ही रस्त्याने धावत धावत गेल्यामुळे लवकर पोहचलो आम्ही पाच किलोमीटर चे अंतर साधारण पंचवीस मिनिटांत आम्ही पार केल .. आज ही ती गोष्ट मला आठवते आम्ही कुठेच विसावा न घेता गेलो होतो . सकाळचे नऊ वाजले होते, .. माकणीतील आमची पाहुणे मंडळी सकाळची काम करत होती. गावाच्या बाजूला वाडीकर पाटलांचा वाडा होता. त्या वाड्यावर आमच्या पाहुण्यातील मरीबा मामा चा मुलगा एकनाथ हा जनावरच शेण काढत होता ..?वर पाहून म्हणाला काय हो दाजी .. लय .. भेगी .. आलो .. दादा कड ..(माझ्या मामा ला सर्व भावकितील लोक दादा म्हणत असत ) आल्या काय ..? म्हणून आमच स्वागत..... हातात शेणाची टोपली घेऊनच स्वागत केला ..? म्हणाला ..,! मायला, .. बक्कळ राम पायऱ्यांत आल्या . सकाळी निघल्या .. वाटत ? लई डेअरिंग केल्या हो"...... "मायला त्या .. सागोण पडीत लईभिती वाटते " ध्या .. दुपारी गांड .. फाटते( भीती वाटणे) " असे म्हणू लागला आम्हाला ही आम्ही एक मोठी कामगिरी केल्यासारख वाटू लागलं ..?एकनाथ हा माझ्या चुलत मामाचा मुलगा होय ... तसा, चांगला माणूस होता. त्याला कोणाच काही घेण ना देन होत निर्मळ मनाचा माणूस म्हणजे एकनाथ दाजी होय ..? आम्ही दोघं भाऊ सकाळी सकाळी.. एकदाच आजोळात पोहचलो शेजारच्या मंडळीने .. गंगा चे पोर आल्यात म्हणू लागले ( गंगा हे नाव माझ्या मायच्या माहेरच होत ) हे पोर एवढ्या सकाळी सकाळी का..? आले असतील म्हणून आमच्याकडे उत्सुकतेने पाहू लागले . गावातून चालत चालत .. आम्ही दोघे भाऊ एकदाच मामा च्या घरी पोहचलो .. आम्ही आजोळात जाऊन बसलो. मामी आल्या अतिशय प्रेमान आमच स्वागत केल ..?एवढ्या सकाळी हे कसे काय आले आहेत ..? या कडे सगळ्यांचे लक्ष लागल होत . आजोबा बसले होते . जवळ बोलावले आणि " अतिशय प्रेमान ....... ?मायन डोक्यावरून हात फिरवला ..? आणि मनाशी स्वत:ला म्हणाला काय..?रे " देवा माझ्या पोरीला एकटीला सोडून गेला" ..? हे चिमणे कसे जगत

https://www.gapbhasha.org/

असतील म्हणू लागला ..?तेवढ्यात मामी आली आणि म्हणाली ...... ! राहू द्या .. लेकरांपूढ काय .. नशिबाला दोष देता. म्हणून मामी आजोबावर रागावली .. आमच लक्ष त्यांच्या कोणाच्याच बोलण्यावर नव्हतं ..? कधी एकदाचा महादू बेपारी मामा येईल या कड आमच लक्ष लागल होत ..?

तेवढ्यात माधव मामा आला आणि त्याला अगोदरच आम्ही येण्याची त्याला कल्पना होती .. म्हणून तो ज्यास्त काही न बोलता या.. हो जावई म्हणून बाहेरून आवाज दिला ..? चला आता गाय पाहायला जाऊ म्हणू लागला ..!मनाला फार बर .. वाटल .. तेवढ्यात आजोबा म्हणाले "कोण .. महादू .. काय कुठ घेऊन जातोस आंबलग्याच्या सोयऱ्याला " मामा म्हणाला ". आप्पा .. मला बऱ्याच दिवसापासून बाई म्हणत होती एक चांगली गाय बघ म्हणून ..? बापूराव पाटलाकडे हाय .. बारकी .. कारवड .. ते दाखवतो म्हणताच .. आजोबा म्हणाला ह्या लेकरला काय कळणार हाय .. थांब मी येतो .. उठला .. च्या भणी .. किती मरमर करते तिच तिलाच माहीत रे बाबा.. ? पैसे कुठून आणली , असल या विचारात असताना महादू मामा म्हणाला .. बाई लई .. जिद्दबाज हाय ..?आप्पा .. "तीन.. हे सहा लेकर कशी ठेवली .. एखाद्या कर्मचाऱ्यासारखी ...... म्हणू लागला. तेवढ्यात समोर बापू पाटील दिसला कुठ निघाले चुलता पुतणे .. म्हणून वाटतच बापू पाटलाने "हटकीला"(आवाज देणे ) दोघा मध्ये राम .. राम .. झाला .. ? आणि मुख्य विषयाला वळले .. पाटील तुमच्या ढोरात एक कारवड .. हाय .. म्हणून कळलं .. जी ..? आमच्या आंबलग्याच्या बाईला पोसायला पाहिजे ..? महादू म्हणाला.. तेवढ्यात बापू पाटील हसत.. म्हणाला .. तुमच्या बेपाऱ्याचा काय भरवसा हाय .. होय .. गोविंद नाईक..! पाटील म्हणाला.. लगेच आजोबा म्हणाले,नाही.. पाटील .. जीव मारून थोडे पैसे जमा केली .. माझ्या पोरीने ह्या लेकराला पाठवली हाय बघा ..? नाही र नाईक मी महादुला नेहमी हसतो ..? हे बेपारी पायातील चप्पल रुमालात बांधून दिवसभर .. बाजाराने फिरतात .. या भाकरी ची शपथ खात .. म्हणून पाटील हसला ..? सारे हसायला लागले आम्ही दोघ भाऊ पण त्यांच्या तोंडाला पाहून .. निरागस हसायला लागलो .. पाटील म्हणाला .. बर .. हसण्याचा भाग झाला आहे .. सांगा कोणती घेता माझ्याकडे या वर्षी बरीच वासर आहेत ..? सांगा म्हणताच आजोबा म्हणाला .. तुम्हाला काय माहीत नाही का ..? आम्हाला मोठी गाय परवडणार नाही .. जी ..? चांगल्या गाईची एक कारवड द्या ..? लेकर आल्यात सकाळच्या राम पायऱ्यांत म्हणू लागला .. पाटील म्हणाला .. काल आंबलग्याचा खाटीक आला होता . बक्कळ मागला .. पण मी आमच्या बाप दादा पासून आमची घरची जनावर खाटकाला दिलो नाही ..! हे तुम्ही आलो .. ते ही बाई लेकीला पोसायला पाहिजे ..,म्हणून देतो सांगा.. कोणतीही घ्या .. ? पाटील म्हणाला .. महादू मामा म्हणाला तुमच्या मोट्या गायच्या कारवडीची किती किमत .. म्हणता ते सांगा ..? चांगली हाय .. काय तर होईल पैशाच .. तुम्हाला पसंत कोणती हाय ते सांगा ..? पाटील म्हणाला . ही कोणत्या गायची हाय कारवड .. पाटील .. त्याच गायची हाय .. तिची माय चार लिटर दूध देते म्हशी सारख दूध घट्ट हाय तिच्या मायच म्हणू लागला .. आम्ही दोघं भाऊ त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊन ऐकत होतो आम्हाला काहीच कळत नव्हत ..? आपणाला गाय मिळणार की नाही या कडे आमचे पूर्ण लक्ष लागल होत ..? तेवढ्यात पाटील म्हणाला घ्या हे कारवड आता मिरगाच्या हिरवटीवर .. गाभा जाते .. घ्या ते लई बी बारकी कारवड घेऊन काय फायदा हाय ..! होय , महादू .. तू सांग की,.. तू बऱ्याच बाजाराला जातोस , चार बाजार तू बघला हाइस .. सांग तू .. काय देतूस ..? पाटील म्हणाला .. ? महादू मामा म्हणाला द्या पाटील बाईलेकीला पाहिजे बाजाराच काही खर .. नाही .. खाटक .. जनावरांच्या बाजारात पार पडून मागता ते इथ कस चालेल .. पोसायला पाहिजे म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो .. पाटील, ते सोड तुम्ही किती देता ते सांगा, .. सांग गोविंद नाईक , .. पाटील आमच्या आजोबावर किमत करायच सोडला .. गोविंद नाईक सांगाव म्या द्याव आस म्हणताच .. आजोबा म्हणाला पाटील .. पाचशे रुपयाला द्या .. ? महादू मामा म्हणाला बरोबर .. "हाय.. जी ..? पाटील, द्या नगदी पैसे हाइत ..? पाटील म्हणाला काय ..? महादू, तुला बाजारात एवढ जनावर भेटते का ..? पाचशे रुपयाला . बाजारच काय सांगू नका मला आप्पा म्हणाला.. पाचशे रुपयाला तर आजून एक पन्नास रुपये मी देतो बाई लेकीला द्या म्हणाला ..? आजोबा म्हणाले .. बर पाटील आता बरोबर हाय .. जी..? द्या .. पाटील म्हणाला तुझे पाचशे आणि महादूचे साडे पाचशे राहू द्या सहाशे रुपये द्या आणि घेऊन जावा भल होईल .. जाऊ ते म्या ही बाईलेकीला दिलो समजतो म्हणून आमच्या गायचा सौदा झाला .. माझ्याजवळ असलेले सातशे रुपये मी मामाला दिलो मामा ते व्यवस्थित मोजून सहाशे दिला आणि शंभर रुपये माझ्या कडे दिले आम्ही आता खूप खुश झालो होतो .. आत्ता आपण गाय घेऊन जाणार म्हणून .. पाटील म्हणाले जावा घेऊन आज च नेता की कारवाडीला .. आजोबा म्हणाला हा.. पाटील जेवण करून .. जातात आत्ता., म्हणून पाटलाला पैसे देऊन आम्ही घराकडे निघालो . मन आमच आता आनंदी

https://www.gapbhasha.org/

आनंदी झाल होत आत्ता आमच जेवण करण्याकडे बिलकुल लक्ष नव्हत ,एकदा गाय घरी घेऊन जाण्याची मनात घाई.. निर्माण झाली होती . आजोबा आणि मामा दोघे चरच्या करत घरी पोहचलो आत्ता मामी न जेवायला बरच स्वादिष्ट जेवण बनवल होत , आजोबा मामी ला म्हणाले लेकर कवा..? जेवण करून आल्यात की काय..? नाही पार्वतीबाई लेकराला जेवण दे वाढून .. म्हणताच मामी भरला प्लेट घेऊन आली आणि म्हणाली ..” या माय ..? जेवण करा ..? येळ .. झाला लई .. घ्या तुमच्या मामाला येण्यासाठी वेळ लागते ,.. तवर तुम्ही जेवण करा म्हणून .. मामीने आम्हाला पोटभर जेवण घातल..? आम्हला पण जोरांची भूक लागली होती ..? चार दिवसाचे भुके असल्यासारखे गप्पा गप्प .. जेवण केलो ..? आजोबा म्हणाले, आज रहा उदयाला जावा... म्हणू लागला पण आमची राहण्याची आजीबात इच्छा नव्हती .जेवण झालं आणि आम्ही गावाकडे जाण्याच्या विचारात होतो .. आजोबांनी आम्हाला राहण्यासाठी भरपूर आग्रह केला पण आमची राहण्याची तयारी नाही म्हणून त्यांनी आमची उन्ह.. होण्याच्या अगोदर जाण्याची व्यवस्था केली गायला बांधायला एक सोल दिला . आणि बापू पाटलाच्या घरून आम्ही कारवड घेतली .. आणि थेट आंबुलगा गाठलो ..? माय आमची वाट च बघत होती .. आम्ही गावाजवळ आलो गावातील जनावरे सुटण्याची वेळ झाली होती “बंबाट बाबू जुन्या सरपंचाचे जनावर घेऊन जात होता. त्यान आम्हाला प्रथम हाक.. मारली मामाची गाय दाबल्या का..? र .. ताना .. आम्ही म्हणालो नाही ,एक हजारला आनलाव ..? फुकट कोण देते , मामा ..? म्हणाला गावातील सर्व लोक माझ्या छोट्या भावाला ओळखत होते. त्याच्या तुलनेने मला फार तुरळक लोकांच्या ओळखी आहे .

गावाच्या पांदिला आलो आमच्या मांगुडयातील भावकीची लोक हिरमूल्यागत पाहू लागले ..? काय पोर माय ग्यानू चे म्हणून कोणी कौतुक करू लागली ..? माझी गावातील आत्या काळूबाई.. आली आणि म्हणाली कोण मामा दिला काय ..? गाय .. माय म्हणाली नाही बाई कोण देते गावातील पाटलांकडून विकत आणलोय .. म्हणाली .. आत्या हसत म्हणाली ,एवढे पैसे कुठ ठेवली बापू तुझी माय म्हणाली ..? सारे आमच्याकडे पाहू लागले ..? मायन नवीन आलेल्या गाय चे कुंकू लाऊन पूजा केली .. भाकर दिली आणि घरातील वातावरण आनंदी झालं ..?

आम्ही माकणी जाऊन गाय आणल्या मुळे मायची ही कामाची गती वाढली आणि दिसा - मासा आमच्या घरची कारवड मोठी झाली आणि आम्ही शाळेत जाऊन शाळा सुटल्यावर गायला गवत आणू लागलो ही कारवड धोरातील असल्यामुळे .. आमच्या घरी लवकरच सुधरली मोठा रोपची असल्यामुळे कारवडच असताना मोठ्या गायी सारखी वाटू लागली आमच्याकडे लवकरच गाभण राहिली .. आणि पहिल्या विताला लाल कंजारी गोर दिली सारे लोक .. ते वासरू जन्मताच त्याची किंमत करू लागली .. ? आता आमची कारवड ही मोठी गाय झाली आणि गोर दिल्यामुळे तिचा ज्यास्तच घरात आम्ही लाड करू लागलो .. ? खरोखरच माझ्या जीवनाला आकार मिळाला त्या गायीमुळे करण माझा दहावीचा निकाल अजून येयांचा होता आणि आमची गाय जातवाण गोर होत .. त्यामुळे बाजारात आत्ता आमची पत झाली कारण मला अकरावीत प्रवेश घेयायचा होता .. माझ्या छोट्या भावाला बालपणापासून जनावरे सांभाळण्याचा शोक होता तो गाईची फार काळजी घेऊन वाढवल्यामुळे आज घरी पाच हजार रुपयाच वासरू होत .. सारे लोक आमच्याकडे कौतुकाने पाहू लागले होते ..? आमच्या घरी कारवड , आणल्या दोन महिन्याने गाभा गेल्यामुळे ते आम्हाला लवकर फायदा करणार होती . या सगळ्या गोष्टीची जाणीव माझ्या मायला होती ती अतिशय दूर दृष्टीकोन समोर ठेऊन चांगल्या जातवाण गायची कारवड आणण्याचा मायचा माझ्या मानस होता. आणि आमच्या घराला घरपण आल ते म्हणजे गायन आणि मायन कर्ज बाजारात बुडालेला संसार “मायन आणि गायन” उभा केला . आमच्या भावकितील लोक अंगात हत्तीच बळ घेऊन राब राब राब .. राब .. राबायचे आणि संध्याकाळी ..? दिवसभराची कमाई दारूत खर्च करायची ..? बाप आणि मूल एकाच गावटी हातभट्टीवर माल पित बसायची ..? माय माझी यांच्या जीवनाच्या आणि कश्या दुर्दशा झाल्या याचे उदाहरण देऊन आमच्यावर चांगले संस्कार करायची ..? बापू .. बालू .. रोज तूप प्याव काही कमी पडत नाही ..? पण हे पैसा घालून मुताड .. पिन .. लई वाईट हाय “ बापू काही करा पण तुम्ही .. तुमच्या नातलगा सारख वाया जाऊ नका रे ..? हे माझ तुमच्याकडे मागणं राहील बेटा म्हणून आजही तोच उपदेश करत असते ..? बाल पणापसून मायन आमच्यावर चांगले संस्कार केल्यामुळे आज कुठे आम्हाला सुखाचा घास इज्जतीन मिळतो हे माझ्या मायच्या बालपणाच्या शिकवणीमुळे साध्ये झालं आहे. जस जस ,,.. आम्ही मोठे होत गेलो तस, तसे , आमच्या आर्थिक परिस्थितीत बदल होत गेल कारण आमच्या घरची गाय वर्षाला एक गोर देयायची आणि आम्ही त्यातून आमचा वर्षाला आर्थिक फायदा व्हायचा . आणि एक ,एक करून आम्ही चार वर्षात चांगलेच पैसे जमवल आमी बापाच्या अंगावरल सार कर्ज आम्ही कमी केल आणि कर्जाला कंटाळून रान पडलेल्या

https://www.gapbhasha.org/

GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

माझ्या बापाला आम्ही घरी बोलावल आणि साऱ्या कर्जातून आम्ही मुक्त झालो . नाही तर आम्हाला उभ आयुष हे बाप असून .. नसल्यासारख आम्हाला जीवन जागाव लागल असत ..? कारण माझ्या वडिलांच कर्ज न फिटनार होत सारे सख्ये गणगोत आमच्यावर झालेल्या बाकीमुळे दूर गेले होते. परंतु माझ्या मायन मेहनत करून माझ्या बाबांच्या उघड्या संसाराला उभ केल ..?

https://www.gapbhasha.org/